# उल्हासनगर महानगरपालिका

पर्यावरण विभाग
दिनांक:- ८ सप्टेंबर, २०२२

## प्रेसनोट

केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे प्राप्त निर्देशानुसार दिनांक ७ सप्टेंबर, २०२२ रोजी निळया आकाशासाठी आंतरराष्ट्रीय शुध्द हवा दिवस साजरा करुन त्याद्वारे जनजागृती करणेबाबत कार्यक्रमाचे नियोजन करणेबाबत सुचना प्राप्त झाल्या होत्या.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागातर्फे आंतरराष्ट्रीय शुध्द हवा दिवस साजरा करण्याच्या उददेशाने मा. आयुक्त, अजीज शेख, मा. अतिरिक्त आयुक्त, डॉ. करूणा जुईकर तसेच उप-आयुक्त (पर्यावरण) डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सकाळी ११.३० वा. उल्हासनगर-१ येथील केसरी गणेश उत्सव मित्र मंडळाचे रहिवाशी यांना वायु प्रदुषण म्हणजे काय, वायुप्रदुषण कशामुळे होते, वायुप्रदुषणाचे परिणाम काय होतात तसेच वायुप्रदुषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना करता येतील याबाबत IIT, Powai येथील प्रा. मिलींद कुलकर्णी, यांचेमार्फत मार्गदर्शन करण्यात आले.

तथापि, उल्हासनगर महानगरपालिका हददीतील शाळा, कॉलेजमधील विद्यार्थयांची पर्यावरण व वायुप्रदुषण या विषयावर आंतरशालेय निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धा आयोजित करून उत्कृष्ट विद्यार्थ्यांचे सन्मानचिन्ह देवुन तसेच सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आले. दोन्ही कार्यक्रमांच्या ठिकाणी हरीत शपथ घेण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे नियोजन उल्हासनगर महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागच्या विभागप्रमुख श्रीम. विशाखा सावंत, लिपीक श्री. सयाजी घाटविसावे यांनी केले. तसेच सदर कार्यक्रमासाठी शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी, श्री. मोहिते व त्यांच्या अधिपत्याखालिल सर्व समग्र शिक्षा अभियानअंतर्गत कार्यरत शिक्षक वृंद यांचेदेखील मोलाचे सहकार्य लाभले.

( डॉ. करूणा जुईकर )
अतिरिक्त आयुक्त (सेवा)
उल्हासनगर महानगरपालिका